परत इंचार्ज करिला

ये.का.मु.-४०,००० पु. (२५ x ६)-०८-२०१०-ए ३-वि (वाय) ३५६

FORM - 1A — N.C.R.B. — I.I.F.-1 — 06

# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State: महा — जिल्हा District: मुंबई — पोलीस ठाणे Police Station: ला.प्र.वि — पहिली खबर क्र. FIR No.: 28/2018 — वर्ष Year: 2018 — दिनांक Date: 27/10/2018

2. (i) अधिनियम Act: भ्र. प्रअधिनियम १९८८ — कलमे Sections: 7, 13(1)(d) सह 13(2)
   (ii) अधिनियम Act ............ कलमे Sections ............
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ............

3. (a) अपराधाची घटना : वार Occurence of offence : Day 15/10/18 — तारीख पासून Date from 20/10/18 — वेळ Time ............ — तारीख पर्यंत Date to 22.20 — वेळ Time ............

   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी अशी खूण करा. Tick applicable portion)

3. (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00 (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00

   (b) पो. ठा. ला माहिती मिळालेची Information received at P. S. — तारीख Date: 20/10/18 — वेळ Time ............

   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No.: 02/18 — तारीख Date: 27/10/2018 — वेळ Time: 00.30 वा.

4. माहितीचा प्रकार Type of information : लेखी / तोंडी Written / Oral: लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurence : (a) Direction and distance from P.S.: सह दुय्यम निबंधक वर्ग 2, अंधेरी-1 यांचे कार्यालय — चौकी/बीट/दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki/Beat/O.P. Name and No. ............

   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurence Name: म.न.पा. इ.इ. बिल्डींग पारसी कॉलनी, र.शा.मार्ग, दाऊभाई पटेल, अंधेरी (प) — ठिकाणाचे नंबर No. If any ............ — गल्ली Ward ............ — रस्त्याचे नाव Name of road ............

   जवळचे ओळख चिन्ह/ठिकाण Nearest Adentifiable Place ............ गाव Village ............ पोस्ट Post ............ तालुका Taluka ............ जिल्हा Dist.: मुंबई — राज्य State: महाराष्ट्र

   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ............ तालुका Taluka ............ जिल्हा Dist. ............ राज्य State ............

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant/Informant ; Permanent Address

   (a) नाव Name: प्रसन्न प्रदिप भालशे — (b) वडिलाचे / पतीचे नाव Father's / Husbands Name: प्रदिप भालशे

   (c) जन्मतारीख व वय Date of Birth & Age: 28 वर्षे — (d) राष्ट्रीयत्व Nationality: भारतीय — फोन नं. Phone No.: [illegible]

   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ............ दिल्याचा दिनांक Date of Issue ............ दिल्याचे ठिकाण Place of Issue ............ (f) व्यवसाय Occupation: व्यवसाय

   (g) धर्म Religion: हिंदु — जात Caste: — — जनजात Sub-Caste ............

   (h) पत्ता : गल्ली/सर्व्हे नं. Address : Ward ............ घर/नाव नंबर House/Name No. ............ फोन/मो. नंबर Phone/M. No. ............ पॅन नं. Pan No. ............ ओटर्स नं. Card No. ............

   यश पॅलेस, 4 था मजला, रुम क्र. 407, डिसिल्वा रोड, दादर (प), मुंबई 28

   रस्त्याचे नाव Road ............ जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ............ गाव Village ............ पोस्ट Post ............ पो.स्टे. P. Stn. ............

   खेड एस.टी. डेपोच्या समोर, ता. खेड जि. रत्नागिरी

   तालुका Taluka ............ जिल्हा Dist. ............ राज्य State ............ सध्याचा पत्ता Present Address ............

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म I B वर वेगळ्या सिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व स. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे).
   Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary) (If suspect particular of physical feature write on Form I-B of attach FIR I-B to case diary).

रमाकांत भागोजी डोंगरे, वय 55 वर्षे, सह दुय्यम निबंधक, सह दुय्यम निबंधक कार्यालय अंधेरी-1 अंधेरी (प) मुं. रा. ठि. फ्लॅट नं. 1002, 10 वा मजला, बजाज पॅलेस युनियन पार्क, रोड नं. 3, खार पूर्व, मुं 52.
गावचा - पो. वेळगाव, ता. नांदगाव, जि. नाशिक.

खालील नमूद फि. श्री. प्रसन्न प्रदिप भालेरो, वय २९ वर्षे
व्यवसाय वकिली, रा.ठि. यश प्लाझा, ४था मजला
खो.क्र. ४०१, डिसिल्वा रोड, दादर (प) मुंबई २८
व खेड एस.टी डेपोच्या समोर, ता. खेड, जि. रत्नागिरी
यांचा स्वतंत्र कागदावर संगणकाद्वारे टंकलिखित केलेला
जबाब हा गुन्ह्याची पहिली खबर म्हणून संबोधण्यात
येत आहे.

समक्ष

(सुनिल बिले)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
मुंबई.

फिर्याद दिनांक २१/०७/२०१८

श्री. प्रसन्न प्रदिप मालशे, वय २९ वर्षे, धंदा – व्यवसाय (वकील), रा.ठि.– यश प्लाझा, ४ था मजला, खो. क्र. ४०१ डिसिल्व्हा रोड, दादर (पश्चिम), मुंबई २८, मो.नं. ८९७६२६३८२६

———०००———

मी वर नमूदप्रमाणे असून नमूद ठिकाणी माझी पत्नी सौ. वेदवंती वय २६ वर्षे व लहान भाऊ कु. अमेय वय २२ वर्षे यांच्या सोबत मागील ५ महिन्यापासून वर नमूद पत्त्यावर भाडेतत्वावर राहण्यास आहे. मी मागील १० वर्षापासून मुंबईमध्ये रहात आहे. माझे मुळ गाव हे खेड, ता. खेड, जि. रत्नागिरी येथे आहे. सदर ठिकाणी माझे आई वडील रहातात. मी सन २०१२मध्ये एलएलबी ची परिक्षा पास होवून मला वकिलीची सनद मिळाली आहे. सध्या मी सेशन कोर्ट, मॅजिस्ट्रेट कोर्ट व सिव्हील कोर्ट, मुंबई येथे वकिलीचा व्यवसाय करत आहे. सदर व्यवसायाच्या अनुषंगाने माझे न्यु समाधान दत्तगुरु हौ. सो.लि., १ ला मजला, तिरुपती ट्रेनिंग सेंटर, सेनापती बापट मार्ग, दादर (पश्चिम) मुंबई २८,येथे कार्यालय आहे.

माझा चुलत भाऊ श्री. विशाल ईश्वर मालशे, रा.ठि. खो.क्र. २०१, तेजल रेसीडेन्सी, केव्हज रोड, जोगेश्वरी पूर्व, मुंबई ६० हा मर्चंट नेव्ही मध्ये गेल्या १४ वर्षापासून काम करतो. सध्या तो ॲन्गलो इंस्टन्ट शिप मॅनेजमेंट हॉगकॉग या कंपनीमध्ये थर्ड ऑफिसर म्हणून कार्यरत आहे. शिपवर गेल्यावर तो सहा–सहा महिने घरी येत नसल्याने त्याने त्याचे वडील श्री. ईश्वर बाळकृष्ण मालशे, वय ६६ वर्षे, रा.ठि. अब्दुल रेहमान चाळ, समर्थ नगर, मजासवाडी, जोगेश्वरी पूर्व, मुंबई ६० यांच्या नावे मुखत्यार (जनरल पॉवर ऑफ ॲटर्नी) पत्र तयार करावयाचे असल्याने त्यांनी सदरचे काम मला करावयास सांगितले होते. त्याकरीता लागणारेमुद्रांक शुल्क व नोंदणी शुल्क रु. ६००/– व दस्त हाताळणी फी रु. ३४०/–अशी माझ्या पत्नीच्या बॅक ऑफ बडोदा बॅकेच्या सेव्हिंग खात्यामधुन ऑनलाईनव्दारे भरली. सदर दस्तऐवजाची नोंदणी करण्याकरीता दिनांक १७/०७/२०१८ रोजी मी, माझा चुलत भाऊ विशाल, त्याचे वडील श्री. ईश्वर मालशे व साक्षीदार म्हणून सही करण्याकरीता भावाचे मित्र श्री. प्रविण गद्रे व श्री. सतीश गोगटे असे सह दुय्यम निबंधक, अंधेरी १ यांचे कार्यालय एमटीएनएल बिल्डींग, ललूभाई पार्क, अंधेरी पश्चिम, मुंबई येथे आलो. सदर ठिकाणी मी दस्तऐवज नोंद करुन नोंदणी पावती घेतली व त्यावर सह दुय्यम निबंधक श्री. रमाकांत डोंगरे यांची सही घेण्याकरीता त्यांच्या कॅबिनमध्ये गेलो. श्री डोंगरे यांच्याकडे मी दस्तऐवज सादर केला असता, सदरचा दस्तऐवज पाहताना श्री. डोंगरे यांनी आमचे काही आणले आहे का? असे मला विचारले. मी त्यांना सांगितले की, सदरचे दस्तऐवज तयार करण्यासाठी लागणारी मुद्रांक शुल्क व नोंदणी शुल्क रु. ६००/– व दस्त हाताळणी फी रु. ३४०/– मी ऑनलाईनव्दारे भरलेली आहे. त्यावेळी लोकसेवक श्री. डोंगरे यांनी माझ्याकडे रु. २०००/– ची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना भावाला विचारुन सांगतो व माझी अजुन ही कामे आहेत असे सांगितले असता, श्री. डोंगरे यांनी मला प्रत्येक दस्तनिहाय वेगळी रक्कम दयावी लागेल असे सांगितले. त्यानंतर आम्ही तिथुन निघालो. लोकसेवक श्री. डोंगरे, सह दुय्यम निबंधक यांना लाच देण्याची माझी इच्छा नसल्याने मी त्याच दिवशी दि. १७/०७/२०१८ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई कार्यालयाकडे ई–मेलद्वारे तक्रार नोंद केली. सदर तक्रारीच्या अनुषंगाने मला लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागाचे पो.नि.डोके यांनी मलाफोन करुन तक्रारच्या अनुषंगाने विचारणा केली. लोकसेवक श्री. रमाकांत डोंगरे यांच्याविरुध्द कायदेशीर तक्रार करायची आहे असे मी त्यांना सांगितल्यावर तक्रार देण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, सरपोचखानवाला रोड, वरळी मुंबई येथे कार्यालयात येण्यास सांगितले.

दि. १८/०७/२०१८ रोजी मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे गेलो व श्री. रविंद्र पाटील, अपर पोलीस उप आयुक्त यांना समक्ष जावून भेटलो. श्री. रविंद्र पाटील, अपर पोलीस उप आयुक्त, यांनी मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पो.नि. सुनिल बिले यांना पडताळणी करण्यास सांगितली. त्यानंतर मी पो.नि.बिले यांच्याकडे माझे स्वहस्ताक्षरात लेखी तक्रार दिली.

मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दि. १९/०७/२०१८ रोजी माझ्या तक्रारीची पडताळणी दोन शासकीय पंचासमक्ष लोकसेवक यांच्या कार्यालयात जावुन केली.सदर पडताळणी मध्ये लोकसेवक डोंगरे हे कार्यालयात भेटले नाही. म्हणून दिनांक २०/०७/२०१८ रोजी पुन्हा शासकीय पंचासमक्ष पडताळणी करण्यात आली. पडताळणीवेळी माझ्या बनियनला व्हॉईस रेकॉर्डर लावण्यात आला होता. पडताळणी दरम्यान लोकसेवक डोंगरे यांनी माझा भाऊ विशाल याच्या बनविलेल्या पॉवर ऑफ अॅटर्नीचे रु. २०००/— व पुढील दोनकामाचे रु. ३०००/— अशी एकूण रु. ५०००/— ची लाचेची मागणी केली. त्यानंतर मी व पंच श्री. अडाऊकर असे परत पोलीस वाहनाजवळ गेलो व पो.नि.बिले यांना लोकसेवक डोंगरे यांनी लाचेची मागणी केली असल्याचे सांगितले. पो.नि.बिले यांनी पडताळणी दरम्यान माझ्या शर्टच्या आतील बनियानला लावलेल्या व्हाईस रेकॉर्डर मधील ध्वनीमुद्रीत संभाषण पंचासमक्ष ऐकूण लाचेच्या मागणीबाबत खात्री झाल्यावर सापळा कारवाई करण्याचे ठरविले. लाचेची रक्कम म्हणून मी, पो.नि.बिले यांना माझ्या बचती मधील रु. ५०००/— दिले. सदरच्या रक्कमेस पोलीस चालक श्री. धुंगरट यांनी अॅन्थॉसीनची पावडर लावली व ती रक्कम माझ्या शर्टच्या डाव्या खिशात ठेवली. त्यानंतर मी व पंच श्री. अढाऊकर असे लोकसेवक श्री. डोंगरे यांना भेटण्याकरीता त्यांच्या कार्यालयात गेलो. सदरवेळी माझ्या सोबत पोलीस पथक होते. लोकसेवक डोंगरे यांच्या कार्यालयात आल्यावर मी त्यांच्या कक्षात गेलो असता आमच्यामध्ये कामासंदर्भात चर्चा झाली. लोकसेवक डोंगरे यांनी माझ्याकडे पैशाची मागणी केल्यावर मी त्यांना माझ्या शर्टच्या डाव्या खिशात ठेवलेली लाचेची रक्कम रु. ५०००/— लोकसेवक डोगरे यांना दिली ती त्यांनी उजव्या हाताने स्विकारुन डाव्या हाताने त्यांच्या समोरील टेबलच्या डाव्या खणात ठेवली. त्यानंतर मी लाच स्विकारल्याबाबत डोक्यावर हाथ फिरवून पुर्व नियोजित इशारा केल्यावर कक्षाच्या बाहेर उभे असलेले पोलीस पथकातील अमंलदारांनी लोकसेवक डोंगरे यांना लाचेच्या रक्कमेसह रंगेहाथ पकडले.

वरील नमुद दि. २०/०७/२०१८रोजीच्या पडताळणी व सापळा कारवाई दरम्यान माझे लोकसेवक डोंगरे यांचेशी झालेले संभाषण मला लावलेल्या डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रित करण्यात आले आहे.

लोकसेवक रमाकांत डोंगरे यांच्याशी माझे कोणतेही पुर्ववैमनस्य नाही किंवा माझे त्यांचेशी कोणत्याही प्रकारचे आर्थिक देवाण—घेवाणीचे व्यवहार नाहीत. तरी लोकसेवक रमाकांत भागोजी डोंगरे यांनी माझ्या भावाचे मुखत्यारपत्र (जनरल पॉवर ऑफ अॅटर्नी) करुन दिले त्यासाठी रु. २,०००/— व आणखी दस्त नोंदणी करुन देण्यासाठी रु. ३,०००/— असे एकूण स्वत:करीता रू. ५,०००/— इतक्या लाचेची मागणी केली वस्विकारण्याचे मान्य करुन रु. ५,०००/— रक्कम दिनांक २०/०७/२०१८ रोजी स्विकारली म्हणुन माझी त्यांच्या विरुध्द् कायदेशिर फिर्याद आहे.

माझा जबाब मराठीत संगणकीकृत केला असून मी वाचुन पाहिला असता तो मी सांगितल्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

(सुनिल बिले)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

92

8. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ............ पडताळणी नंतर लगेच
Records for delay in reporting by the Complainant/informant

9. चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proform) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ............ रोख रु. ५०००/-
Total value of properties stolen and involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recover Properties) रोख रु. ५०००/-

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ............
Unnatural/Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील को-या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

खालील नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी श्री प्रसन्न मालशे यांच्या चुलत भाऊ विशाल ईश्वर मालशे याचे कुलमुखत्यार पत्र दि.१६/०७/१८ रोजी करुन दिले या केलेल्या कामाच्या मोबदला म्हणून तसेच आणखी दस्त नोंदणी करुन देण्यासाठी श्री. रमाकांत भागोजी डोंगरे, सह दुय्यम निबंधक सह दुय्यम निबंधक अंधेरी-१ कार्यालय, अंधेरी (प) मुंबई यांनी कायदेशिर परिश्रमिका शिवाय पारितोषण म्हणून स्वतःसाठी रु.५,०००/- लाचेची मागणी करुन ती स्विकारली म्हणून कलम ७, १३(१)(ड) सह १३(२) भ्र.प्र.अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा नोंद

13. केलेली कार्यवाही .— 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला. तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा ............

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण. ............

3. दुस-यां पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ............ जिल्हा ............ राज्य ............

*Action taken* .— Since the above information reveals Commission of offence (s) u/s. as mentioned at Item No. 2 :

(1) Registered case and took up the investigation or Directed (Name of I. O.) ............ Rank ............ No. ............ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ............ (3) Transferred to P. S. ............ District ............ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून/वाचून/ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.

(R.O.A.C.)

पोलीस ठाणे प्रभारी अधिका-याची सही.
Signature of Officer Incharge, Police Station.
संपूर्ण नाव Name ... सुनिल किडे
पदनाम Rank ... पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड क्र.
Posting लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुंबई
Coding No. of I. O. ............

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant/Informant

15. १. न्यायालयास सादर केल्याची तारीख ............
1. Date and time of submitted to the Court

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.